# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५
## (सकाळी १०.०० ते ११.१५ वाजता)

**(क) : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

(१) **(मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५, बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५, गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५, शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ व सोमवार, दिनांक १४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री सदाशिव खोत**, हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रविण दरेकर, डॉ. मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, प्रसाद लाड, श्रीमती भावना गवळी, श्री संजय खोडके, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा किशोर वाघ, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, किरण सरनाईक, डॉ. परिणय फुके, सर्वश्री संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केणेकर, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री विक्रांत पाटील, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, ज्ञानेश्वर म्हात्रे, रणजितसिंह मोहिते-पाटील, धर्मगुरू राठोड, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरु )**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रिमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात

शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस इत्यादी धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पध्दतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, "मॅगनेट २.०" अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतकऱ्यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करुन देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **(गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५, शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ व सोमवार, दिनांक १४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल दत्तात्रय परब, सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, सर्वश्री जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, अरुण लाड, वि.प.स. **यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु )**

"राज्यात आदिवासी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांत गंभीर त्रुटी असणे, आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची व कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून शिक्षणाचा दर्जा घसरलेला असणे, अनेक आदिवासी पाड्यांमध्ये रस्ते, वीज, पाणी, आरोग्य व शिक्षणाच्या मूलभूत सुविधा अद्याप उपलब्ध नसणे, निधीअभावी योजनांची गतीने व प्रभावी अंमलबजावणी होत नसणे, अपघातग्रस्त रुग्णांना वेळेवर प्राथमिक उपचार मिळत नसणे, शासकीय रुग्णवाहिका वेळेवर पोहचत नसून अनेक जिल्ह्यांतील रुग्णवाहिका दुरुस्ती अभावी बंद अवस्थेत असणे, त्यामुळे नवजात बालके व माता यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले असून रस्त्यावरील प्रसूतीच्या घटनांमध्येही वाढ झालेली असणे, शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व अन्य कर्मचाऱ्यांची

असंख्य पदे रिक्त असणे, अनेक वैद्यकीय अधिकारी ग्रामीण भागात सेवा देण्यास नकार देत असल्याने या भागातील आरोग्य व्यवस्था कोलमडली असणे, जन आरोग्य योजनेंतर्गत अनेक रुग्णालयांनी उपचार नाकारल्याच्या घटना घडत असणे, राज्यातील रक्तपेढ्यांवरील रक्ताच्या कमतरतेमुळे अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागणे, त्यामुळे राज्यातील सर्व रक्तपेढ्यांची तपासणी करुन सदरहू रक्तपेढ्या चोवीस तास चालू ठेवण्याची आवश्यकता, धर्मादाय रुग्णालय राज्याच्या नियमांचे सर्रास उल्लंघन करीत असून गरजू रुग्णांना प्रवेश रद्द, आगाऊ रकमेची मागणी व वचनबध्द सुविधा देण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, वैद्यकीय महाविद्यालयांतील संरचना, कर्मचारी व औषधसाठा यांचा दर्जा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असणे, कमी कंटेन्टच्या व बोगस औषधांचा पुरवठा शासकीय रुग्णालयात होत असणे, राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भुखंड वाटपामध्ये झालेली अनियमितता, भूखंडांचा वापर उद्योगासाठी होणे आवश्यक असताना निवासी वापराकरिता खाजगी विकासकांना देण्यात येणे, उद्योजकांना आवश्यक सोयी सुविधा देण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने अनेक उद्योग इतर राज्यात स्थलांतरीत झालेले असणे, जल जीवन मिशन योजनेंतर्गत झालेल्या कामांमध्ये अनियमितता, निकृष्ट दर्जाचे साहित्य, अपूर्ण पाईपलाईन आणि अपारदर्शक खर्च यामुळे हजारो गावांना आजही सुरक्षित पाणीपुरवठा होत नसणे, राज्याच्या प्रगतीचा पाया असलेल्या तरुण पिढीसाठी रोजगाराच्या संधी कमी होत असून शासकीय विभागातील भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याने विविध संवर्गातील ३ लाख पदे रिक्त असणे, याबाबत शासनाकडून वेळोवेळी आश्वासने देऊनही रिक्त जागा भरण्यास होत असलेले दुर्लक्ष, त्यातच सरकारने निवृत्त अधिकाऱ्यांना राज्यातील सरकारी विभागात कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देण्यासाठी योजना सुरु केली असणे, उक्त योजनेस बेरोजगार तरुणांचा असलेला विरोध, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

## (सकाळी ११.१५ ते ११.४५ वाजता)

**(ख) : अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये –**

**(सोमवार, दिनांक १४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक १ व २] –**

(१) **सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, शशिकांत शिंदे, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"भीमा खोऱ्यातील वाढत्या पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी आणि कृष्णा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी वळविण्यासाठी शासनाने २००४ मध्ये कृष्णा-भीमा

स्थिरीकरण योजना मंजूर केली असणे, या योजनेच्या कामाचा शुभारंभ करण्यात येणे, परंतु या योजनेला अद्याप गती मिळाली नसणे, कृष्णा खोऱ्यात शासनाने अनेक उपसा सिंचन योजना मंजूर केल्या असणे, त्यापैकी अनेक योजनांना "शाश्वत" पाणी कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजना पूर्ण झाल्यावरच मिळणार असणे, या योजनेचा मुख्य उद्देश कृष्णा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी भीमा खोऱ्यात आणून सातारा, सांगली, सोलापूर, पुणे, धाराशिव, बीड या जिल्ह्यांमधील ३१ तालुक्यांतील पाण्याची तीव्र टंचाई दूर करणे, याकरिता भूगर्भातील पाण्याची पातळी सुधारुन जलसाठा वाढेल तसेच कृषी क्षेत्रातील उत्पन्न वाढून बेरोजगारी कमी होईल, स्थलांतरण थांबेल आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, तसेच कोल्हापूर आणि सांगली भागांत पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या पूर परिस्थितीमुळे होणारे नुकसानही टाळता येईल, त्यामुळे भीमा खोऱ्यातील विशेषतः उजनी धरणाच्या वरच्या भागातील पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे इतर नद्यांमधून पाणी भीमा नदी व उजनी धरणात वळविणे आवश्यक असणे, याकरिता कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेस गती देऊन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(२) **सर्वश्री सत्यजित तांबे, किशोर दराडे, विक्रम काळे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात दररोज सुमारे ९३०० नव्या वाहनांची नोंद होत असून, या वाढत्या वाहनभारामुळे राज्यातील महानगरांमध्ये एका तासात केवळ १८.५० कि.मी. अंतर कापता येणे शक्य होत असणे, वाहतूक कोंडीचा दर गेल्या ६ महिन्यांत ९०.८४ % ने वाढलेला असून, याकरिता रस्त्यांची अपुरी रुंदी व त्यावरील अतिक्रमण, अपूर्णावस्थेतील उड्डाणपूल, अपुऱ्या पार्किंग सवलती व स्मार्ट सिग्नल व्यवस्थेचा अभाव इ. बाबी जबाबदार असल्याचे स्पष्ट होणे, त्यामुळे महानगरातील मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीत जास्त उपयोग करावा यासाठी शासनाने प्रोत्साहनपर उपक्रम राबविणे आवश्यक असणे, याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे –**

(क) **मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री. सुधाकर अडबाले व इतर वि.प.स. यांचा "राज्यातील बार्टी व महाज्योती मधील संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्र.२५३९.**

**(ख) तारांकित प्रश्न**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** | "महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा निधी विश्वस्त कंपनी मर्यादित (MUIFTCL) यांचा आणि महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादित (MUIDCL) यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(२)** | **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** | **(क)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील. |
| | | **(ख)** "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील. |
| | | **(ग)** "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील. |
| | | **(घ)** "श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील. |
| | | **(ड.)** "महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील. |
| | | **(च)** "महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| **(३)** | **वस्त्रोद्योग मंत्री** | "महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित व महामंडळाची दुय्यम कंपनी प्रताप मिल, अमळनेर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा अठ्ठावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(सोमवार, दिनांक १४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना)-[अनुक्रमांक (१) व (२)] —**

(१) **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील बोरीवली येथील साईबाबा नगर लेआउट एकूण १९,१८७.२७ चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या भूखंडांवर विकास योजनेमध्ये या भूखंडांचा एफएसआयचा वापर करून साईबाबा नगर लेआऊटमध्ये १८ इमारती उभारण्यात येणे, विकास आराखडा, २०३४ नुसार हे भूखंड उच्च शिक्षण संस्था, पालिका शाळा, दवाखाना, वृद्धाश्रम, केअर सेंटर, मैदान व इतर सार्वजनिक उपयोगासाठी राखीव असणे, उक्त भूखंड महापालिकेच्या ताब्यात असूनही नोंदणीकृत कागदपत्रांद्वारे खाजगी विकासकाला विकण्यात येणे, सार्वजनिक उपयोगासाठी राखीव असलेले महापालिकेचे भूखंड विकण्यात येणे, दिनांक १५ मे, २०२५ रोजी सहाय्यक आयुक्त यांनी सीटीएस क्रमांक ४/१ ते ४/१८ वर स्टॉप वर्क आदेश जारी करणे, साईबाबा नगरमधील सर्व १८ इमारती ४५ वर्षांहून अधिक जुन्या असून जर्जर स्थितीत असणे, ४०० हून अधिक भाडेकरूंनी पुर्नविकासासाठी आपले घर रिकामे केले असणे व भाड्याच्या घरांत राहत असणे, या प्रकरणात दोष नसलेल्या निरपराध रहिवाशांवर काम थांबवण्याचा आदेश लागू करणे, दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वरील महापालिकेचे भूखंड विकासकाने नोंदणीकृत दस्तऐवजाद्वारे विकले असणे, महापालिकेच्या दुर्लक्षामुळे हजारो रहिवाशांचे नुकसान होणे, ही अत्यंत गंभीर फसवणूक व अपहार असणे, खरेदी-विक्री करणाऱ्यांविरोधात कडक कायदेशीर कारवाई करुन त्याचप्रमाणे असे दस्तऐवज नोंदवण्यात आलेल्या संबंधित अधिकारी व विभागांवरही चौकशी करून फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. संजय खोडके, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती यांना जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांच्या प्रशासकीय मान्यतेनुसार ४४ लक्ष रुपयांची कामे व ३ विद्युत कामांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असताना सदर कामे शासनाच्या खरेदी प्रक्रियेनुसार न करता त्यामध्ये अनियिमितता घडवून शासनाची कार्यप्रणाली डावलून मोठ्या प्रमाणात अपहार केल्याबाबत शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष, सचिव यांनी विभागीय आयुक्त, अमरावती, जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडे जानेवारी, २०२५ मध्ये केलेल्या लेखी तक्रारी, त्यामध्ये विशेषत: कृषी उत्पन्न समितीने विद्युत कामामध्ये ई-निविदा कार्यप्रणाली न राबविता एका कामाचे अनेक बनावट प्राकलन तयार करुन नियमबाह्य शासकीय

निधीचा केलेला दुरुपयोग, साफ-सफाई ठेक्यामध्ये झालेला भ्रष्टाचार, कृषी उत्पन्न बाजार समितीने तक्रार मुद्यावर अपूर्ण खोटा, चुकीचा व दिशाभूल करणारा सादर केलेला खुलासा, याबाबत चौकशी करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करणे व पैश्याची वसूली करणे गरजेचे आहे, या अनुषंगाने चौकशी करण्याकरिता उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती व लेखा परिक्षक, अमरावती यांची गठीत करण्यात आलेली चौकशी समिती, त्यानुसार या समितीने अहवाल सादर करुन त्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करणे आवश्यक असताना, अद्यापही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात न आल्यामुळे शेतकऱ्यांत पसरलेला असंतोष लक्षात घेता शासनाने याप्रकरणी वरिष्ठ पातळीवर सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर करावयाची आवश्यक ती कार्यवाही व शासनाची भुमिका."

**(३)** **श्री. विक्रांत पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मालेगाव महानगरपालिकेतील कुरेशी मोहल्ला ते सरदार चौक या भागात रक्तमिश्रीत सांडपाणी वाहत असल्याची नागरिकांनी प्रशासनाकडे तक्रार केलेली असणे, त्यानुसार मालेगाव महानगरपालिकेमधील जनावरांची कत्तल करणाऱ्या २७ व्यवसायिकांना जनावरांची कत्तल केल्यानंतर निघणारे रक्त हे ड्रममध्ये जमा करुन त्याची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याची सूचना दिलेली असणे, परंतु संबंधित व्यावसायिकांकडून या सूचनांचे पालन होत नसणे, त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल झालेला असणे, रक्तमिश्रीत सांडपाणी हे नाल्यांमार्फत मालेगाव मधील मोसम नदीपात्रात जात असणे, राष्ट्रीय सरोवर व नदी विकास कार्यक्रमाअंतर्गत मोसम नदीकृती आराखडा महानगरपालिकेतर्फे सन २०११ मध्येच मंजूर झालेला असणे, नदीकृती आराखड्याअंतर्गत मोसम नदीचे रिटेनिंग वॉल, गटार, क्रॉस ह्युम पाईप, चेनलिंक जाळी बसविण्याकरिता रु.९ कोटी ९० लाखाचा निधी सन २०१२ मध्ये मंजूर झालेला असणे, तरीसुध्दा मोसम नदीलगत असलेल्या अनधिकृत कत्तलखान्यांमधून रक्तमिश्रीत पाणी मोसम नदीमध्ये सोडण्यात येत असणे, अशाच प्रकारे नाशिक शहराचे पंचवटी या धार्मिक स्थळावरील गोदावरी नदीपात्रात अनधिकृत कत्तलखान्यांमधून रक्तमिश्रीत सांडपाणी नदीपात्रात सोडण्यात येत असणे, आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभुमीवर गोदावरी नदीचे पाणी स्वच्छ व पवित्र राहणे गरजेचे असणे, रक्तमिश्रीत पाण्यामुळे भावना दुखावल्या जात असणे, त्यामुळे गोदावरी व मोसम नदीलगत असलेले कत्तलखाने तात्काळ बंद करण्यासाठी व संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मौजे सांबवाडी, सांब मंदिर रोड, पेठ किल्ला, ता.जि. रत्नागिरी परिसरातील रत्नदुर्ग किल्याच्या दक्षिणेकडील पायथ्याशी छत्रपती शिवाजी महाराजांनी टेहळणी बुरुज बांधलेला असणे, या बुरुजाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकामे झालेले असणे, या अतिक्रमण धारकांच्या सोईसाठी नगरपरिषदेने या बुरुजावरती येणे जाणे करिता पूर्वपार असलेल्या रस्त्यावर सुलभ शौचालय बांधून सदर ऐतिहासिक परिसर गलिच्छ केलेला असणे, सदरच्या अतिक्रमणास स्थानिक राजकारणी, लोकप्रतिनिधी यांचे प्रोत्साहन असणे, यावर रत्नागिरी नगरपरिषद प्रशासन कोणतीही कार्यवाही करत नसणे, राजापूर नगरपरिषद हद्दीमध्ये मागील १५० वर्षापासून एक पुरातन सूर्य मंदिर असणे, सदर मंदिराची बांधणी सातवहन राजवटीत हिंदू स्थापत्य शैलीनुसार झालेली असणे, सदर मंदिराच्या परिसरात अनधिकृत मजारिचे बांधकाम झालेले असणे, राजापूर नगरपरिषदेने त्यावर कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, खेड शहरात गुलमोहर पार्क येथे अनधिकृत कम्युनिटी सेंटर तथा मशिदीचे बांधकाम झालेले असणे, यासाठी नगरपरिषद, गृह विभाग यांची परवानगी घेतलेली नसणे, या अनधिकृत बांधकामाबाबत नगरपरिषदेने कोणतीही कारवाई केलेली नसणे, रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व धार्मिक स्थळे यांच्या निष्कासनाबाबत कालबद्ध कार्यक्रम राबविणे आवश्यक असणे, या प्रकरणात कालबद्ध कारवाईच्या अनुषंगाने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **ॲड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत**, वि.प.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील इतर तसेच मौजे जांभे, ता. जि. सातारा येथील जमीन गट नं. ३० क्षेत्र ३११ एकर २३ गुंठे या गटाच्या अधिकार अभिलेखामध्ये सन १९५६ रोजी फेरफार क्र. १६० ने जात इनाम वर्ग-२ खालसा झाली असणे, परंतु उक्त फेरफारचा ७/१२ सदरी अंमलबजावणी न झाल्याने वहिवाटदाराची नावे ७/१२ वर आली नसणे, सदरच्या ७/१२ सदरी मूळ वतनदाराचे नाव राहिल्यामुळे त्यामध्ये खरेदी विक्रीचे बेकायदेशीर व्यवहार झाले असणे, त्याबाबत सन २००४ मध्ये उपविभागीय अधिकारी, सातारा यांचेकडे दाद मागितली असता राजकीय दबावाखाली निर्णय दिला असणे, सदरची जमीन ज्या तत्कालीन उच्चपदस्थ महसूल अधिकाऱ्याने खरेदी केली आहे त्यांच्या कुटुंबीयाकडून मूळ वहिवाटदार यांच्या वारसांवर पोलिसांकडे खोट्या तक्रारी करून दबाव आणण्याचा प्रयत्न करणे, ज्या खरेदीदाराने सदरची जमीन बेकायदेशीरपणे खरेदी केली आहे त्या खरेदीदारावर फौजदारी केस दाखल करणे, तहसीलदार, सातारा यांनी दिनांक १३

जून, २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी, सातारा यांचेकडे दिलेला अहवाल व उपविभागीय अधिकारी, सातारा यांनी दिनांक १४ जून, २०२५ रोजी अपर जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे दिलेल्या अहवालावर कार्यवाही करणे, याबाबत मूळ वहिवाटदार यांचे वारसास योग्य न्याय मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६)** **श्री. रामराजे नाईक-निंबाळकर**, वि.प.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य जलनीतीला अनुसरुन बचतीचे पाणी वापरासाठीचे प्राधान्यक्रम शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ अन्वये विहित असणे, निरा देवघर प्रकल्पाचे कालवे बंद नलिकेद्वारे केल्यामुळे बचत होणारे पाणी शासन निर्णय दिनांक २ फेब्रुवारी, २०१७ मधील मुद्दा क्र. १.९ प्रमाणे CCA व ICA मधील तफावत दूर करणेकरिता वापरण्यात यावे, असे स्पष्ट नमूद असणे, SLTAC-II बैठक क्र. ६९, दिनांक १९ जुलै, २०२२ मधील मुद्दा क्र. ३.५ मध्ये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या अभिप्रायानुसार तफावत दूर करण्याच्या सूचना दिलेल्या असणे, फलटण तालुक्याचे देवघर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये ICA १३,५५० हे. म्हणजेच केवळ ५८% क्षेत्र घेण्यात आलेले असणे, सदरहू बचत होणारे पाणी प्राधान्याने फलटण तालुक्यातील देवघर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील तफावत दूर करण्याकरिता वापरण्यात येऊन बंद नलिकेमुळे झालेल्या ४.०४ टी.एम.सी. पाण्याच्या बचतीमधून फलटण तालुक्यास मिळावे, अशी होत असलेली स्थानिकांची मागणी, त्यातच सदरहू बचतीचे पाणी लाभक्षेत्राबाहेर वळविण्याबाबत प्रशासनाकडून होत असलेल्या हालचाली, यावर तेथील जनमानसात पसरत असलेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(७)** **सर्वश्री जयंत आसगावकर,** प्रसाद लाड, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, धीरज लिंगाडे, वि.प.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सध्या राज्यात पवित्र पोर्टल प्रणालीद्वारे दुसऱ्या टप्प्यातील शिक्षक भरती प्रक्रिया सुरू असणे; ही भरती प्रक्रिया राबविताना संस्थाचालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, शासनाच्या अटीशर्तीच्या अधीन राहून संस्था चालकांकडून भरती प्रक्रियांचे नेटके नियोजन करणे, यासाठी मुलाखतीस्थळी कॅमेरे बसविण्यापासून इतर खर्च उचलणे, या पोर्टलवर कोकण, पश्चिम महाराष्ट्रापासून अगदी मराठवाडा, विदर्भ, खानदेश येथील उमेदवारांची नावे येणे, या उमेदवारांना शाळांच्या पसंतीक्रमाचा पर्याय उपलब्ध असणे, त्यामुळे या उमेदवारांकडून स्थानिक स्वराज्य संस्था अथवा जवळच्या शाळांची निवड होणे,

परिणामी भरतीसाठी येणाऱ्या उमेदवारांची संख्या अगदी नगण्य असणे, एकूण उमेदवारांपैकी केवळ ३० ते ४० टक्केच उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित राहणे, अशावेळी संस्थाचालकांना पुरेशा प्रमाणात शिक्षक न मिळाल्याने शाळेच्या गुणवत्तेवर परिणाम होणे, तसेच ही प्रक्रिया अत्यंत तांत्रिक आणि अनेक टप्प्यांची असल्याने संस्थाचालकांना वेळेत शिक्षक भरती करणे कठीण होणे, लहान संस्था चालकांसाठी ही प्रक्रिया किचकट व त्रासदायक असणे, पवित्र प्रणालीमुळे संस्थाचालकांना स्वतःच्या शाळेसाठी थेट भरती करण्याचा अधिकार कमी होणे, अशा तक्रारी येणे, या साऱ्या बाबींचा विचार करता यातील त्रुटी दूर करणे तसेच शिक्षक भरतीचा अधिकार पूर्वीप्रमाणे संस्थाचालकांना देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(८) **श्री. हेमंत पाटील**, वि.प.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **फलोत्पादन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन केंद्राची वसमत येथे महाराष्ट्र शासनातर्फे दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी स्थापना करण्यात येणे, यापूर्वी या केंद्रास अर्थसंकल्प सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात १०० कोटी रुपये मंजूर होणे, तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ जुलै, २०२४ रोजी हळद संशोधन केंद्राची बैठक घेण्यात येणे, त्या बैठकीमध्ये केंद्राच्या सर्व कामाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने (७०९.२७ कोटी रुपयाचे) DPR सादर करण्यात येणे, सदर DPR ला उच्चस्तरीय समितीने (HPC) सर्व विभागाच्या सचिवाद्वारे तपासणी होऊन मान्यता देणे, त्यानंतर दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या बैठकीमध्ये कॅबिनेट मंत्रिमंडळाने या प्रस्तावास मंजुरी देऊन शासन निर्णयही निर्गमित करण्यात येणे, सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने कृषी व फलोत्पादन विभागाने नस्ती (क्र. हसंप्र/२०२४/प्र.क्र. १२०/९ अे, संगणक क्र. ८२५७७९) UR (यु.आर.) नंबर मागणी करीत फाईल वित्त विभागाकडे दिनांक २८ मार्च, २०२४ रोजी पाठविणे, निधी संदर्भातील शासन निर्णय निर्गमित होऊन १० महिन्याचा तसेच वित्त विभागाकडे फाईल पाठवून ४ महिन्याचा कालावधी उलटूनही अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी निधी अभावी सदर प्रकल्प अद्यापही अपूर्णावस्थेत असणे, शासनाने केलेली १०० रुपयांची गुंतवणूक अर्धवट निधीमुळे फलनिष्पत्ती न झाल्याने वाया जाण्याची शक्यता निर्माण होणे, हिंगोली हा हळद उत्पादनात भारतातील नं.१ चा जिल्हा असून सिंचन, उद्योग व शिक्षणाचा अनुशेष असलेला नव्याने स्थापन झालेला जिल्हा असणे, उक्त प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करून शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

**चार : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**पाच : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ. मनिषा कायंदे, श्री. अमोल मिटकरी, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री संजय खोडके, सदाशिव खोत, कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, अमित गोरखे, किशोर दराडे, पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, किरण सरनाईक, श्रीकांत भारतीय, राजहंस सिंह, वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, डॉ. परिणय फुके, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केणेकर, धर्मगुरू राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात परकीय थेट गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात आघाडीवर असणे, शासनाने स्टार्टअप युको सिस्टीम उभी करण्यासाठी १२० कोटी रुपयांचा 'फंड ऑफ फंडस्' तयार केला असून त्यायोगे आर्थिक सक्षम आणि विक्रीयोग्य स्टार्टअप्सना आर्थिक मदत दिली जाणार असणे, सर्क्युलर इकॉनॉमीवर भर देत महाराष्ट्र राज्य देशाची स्टार्टअप राजधानी बनली असणे, दावोस येथे ६३ कंपन्यांशी झालेल्या सामंजस्य करारातून १५ लाख ७२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असणे, राज्यातील सहकारी संस्थांच्या विकासासाठी व ग्रामीण पतपुरवठा क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी सहकार विभागाकडून अनेक उपाययोजना करण्यात आल्या असणे, 'सहकारातून समृद्धी' हा विकासात्मक दृष्टीकोन वास्तवात उतरविण्यासाठी केंद्र शासनाने 'सहकार मंत्रालयाची' स्थापना करण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले असणे, कृषी पतपुरवठा, सहकारी संस्थांचे संगणकीकरण या योजनेची अंमलबजावणी ५ वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आली असणे, सहकारी संस्थांच्या व्यवसाय वृद्धीसाठी अटल अर्थसहाय्य योजनेस मुदतवाढ दिली असणे, आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. कलाम अमृत आहार योजना, नमो आदिवासी स्मार्ट शाळा अभियान, आदर्श आश्रमशाळा, ठक्करबाप्पा आदिवासी विकास योजना, पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयं योजना इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येत असणे, आदिवासी उपाययोजनेच्या तरतुदीत मागील वर्षीच्या तुलनेत ४० टक्के एवढी भरीव वाढ करण्यात आली असणे, कोकणातील पर्यटनवृद्धी व्हावी व पर्यटकांचा प्रवास सुलभ व सुखकर व्हावा यासाठी कोकणातील १७ रेल्वे स्थानकांना राष्ट्रीय / राज्य मार्गांशी जोडण्याचे काम हाती घेण्यात आले असणे, आंगणेवाडी हे राज्यातील भाविकांचे श्रध्दास्थान असल्याने येथील मंदिराला जोडणाऱ्या ३३ कोटी रुपये खर्चाच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली असणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सागरी संग्रहालय, कृत्रिम प्रवाळ आणि पाणबुडी पर्यटन ही ७५ कोटी रुपये किंमतीची कामे प्रगतीपथावर असणे, पर्यटन क्षेत्रात खाजगी

गुंतवणूकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकूल वातावरण निर्माण करण्याकरिता पर्यटन धोरण-२०२४ जाहिर करण्यात आले असणे, लोणार सरोवराचे जतन, संवर्धन आणि विकासाकरिता लोणार सरोवर विकास समिती स्थापन करण्यात आली असणे, समुद्रातही पिंजरा पद्धतीने मत्स्य पालनास प्रोत्साहन देण्याचे धोरण राज्य शासनाने ठरविले असणे, राज्यातील विविध बांधकाम प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांसाठी राज्यस्तरीय नुकसान भरपाई धोरण आखले असणे, मच्छिमार बांधवांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी पालघर जिल्ह्यातील साठपाटी येथे सर्व सुविधांयुक्त आदर्श मच्छि बाजारपेठ उभारण्याचे प्रस्तावित असणे, सागरी मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील मासेमारी करणाऱ्या नौकांवर वापरण्यात येणाऱ्या नायलॉन व मोनोफिलामेंट जाळी खरेदीवर ५० टक्के पर्यंत व रापण संघाच्या प्रत्येक सभासदाला रापणीच्या तयार जाळयांच्या किंमतीच्या ५० टक्के अनुदान देण्यात येणार असणे, विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी व राज्याला सृजणातून समृद्धीकडे नेण्यासाठी केलेल्या व करावयाच्या उपाययोजना."

**सहा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री संजय खोडके, विक्रम काळे, सतिश चव्हाण, वि.प.स.**

"**विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरीत महाराष्ट्र या तीन वैधानिक विकास मंडळाच्या मुदतवाढीबाबत**" या विषयावरील **श्री. अभिजित वंजारी व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **३९३२** ला दिनांक ३ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **सर्वश्री अंबादास दानवे, सुनिल शिंदे, सचिन अहिर वि.प.स.**

"**वैजापूर (जि. छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अनुदान मिळण्याबाबत**" या विषयावरील **श्री. अंबादास दानवे व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **७०९** ला दिनांक १९ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १४ जुलै, २०२५.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव - ३,
महाराष्ट्र विधानपरिषद.